# अखेर मेट्रो ३ च्या चाचण्यांना सुरुवात

## आरे ते बीकेसी मार्गिकेचे ९४ % काम पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बहुप्रतीक्षित कुलाबा ते सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेच्या पहिल्या टप्प्यातील चाचणी (ट्रायल रन) अखेर सुरू झाली असून, या मार्गिकेचे ९४.७ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे ही मार्गिका सुरू होण्यासाठी आणखी काही महिन्यांचा कालावधी लागणार आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) ३३.५ किमी लांबीची मेट्रो मार्गिका उभारली जात आहे. पहिल्या टप्प्यात मेट्रो ३ मार्गिकेचा बीकेसी ते आरे हा मार्ग वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे. या अंतरादरम्यान एकूण १० स्थानके असतील. पुढील काही महिने मेट्रो गाडीसह विविध यंत्रणांच्या चाचण्या घेतल्या जाणार आहेत. त्यामध्ये मेट्रो गाड्या, डब्बे, सिग्नल यंत्रणा, ट्रॅक ट्रॅक्शन, आदी विविध चाचण्या घेतल्या जाणार आहे. या चाचण्या पूर्ण झाल्यानंतर एमएमआरसी, आयएसएकडून सुरक्षा प्रमाणपत्र मिळविले जाईल. हे प्रमाणपत्र प्राप्त होताच कमिशनर ऑफ मेट्रो रेल्वे सेफ्टी (सीएमआरएस) मार्फत तपासणी केली जाईल. सीएमआरएसकडून प्रमाणपत्र प्राप्त होताच ही मेट्रो मार्गिका सुरू करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

## ऑगस्टपर्यंत पाहावी लागणार वाट

■ सद्य:स्थितीत मेट्रो ३ मार्गिकेसाठी १५ गाड्या आरे येथील कारशेडमध्ये दाखल झाल्या आहेत. यातील ९ गाड्या पहिल्या टप्प्यातील मार्गिकेसाठी वापरल्या जाणार आहेत.



पहिल्या टप्प्यातील मार्गिकेच्या स्थानके आणि बोगद्याची ९९.२ टक्के कामे पूर्ण झाली आहेत.

■ **स्थानकांची ९७.५ टक्के कामे पूर्णत्वास गेली आहेत, तर यंत्रणेची ८३ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे पूर्ण करून मेट्रो मार्गिका सुरू करण्याचा एमएमआरसीचा प्रयत्न आहे. मात्र, यासाठी आणखी काही महिन्यांचा अवधी लागणार आहे. यापूर्वी मेट्रो ३ मार्गिकेचा आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा एप्रिल ते मेपर्यंत प्रवाशांसाठी खुला केला जाईल, असे एमएमआरसीने जाहीर केले होते.**

■ मात्र, या मार्गिकेच्या चाचणीला विलंब झाला आहे. त्यामुळे हा मार्ग सुरू होण्यासाठी आणखी काही काळ वाट पाहावी लागणार असून, हा मार्ग सुरू होण्यासाठी ऑगस्ट उजाडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.